॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

**उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव - ४२५००१**

'A' Grade
NAAC Re-Accredited
(3rd Cycle)

**NORTH MAHARASHTRA UNIVERSITY, JALGAON-425001**

# (निवडणूक शाखा)

## विद्यापीठ प्राधिकरणांच्या निवडणुकांसंदर्भातील सविस्तर जाहीर प्रकटन

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांचे मान्यताप्राप्त मा.प्राचार्य / मान्यताप्राप्त परिसंस्थांचे मा.संचालक, संलग्न महाविद्यालये किंवा परिसंस्था यांचे प्रतिनिधी, शिक्षक, विद्यापीठ शिक्षक, नोंदणीकृत पदवीधर इत्यादींना या जाहीर प्रकटनाव्दारे सूचित करण्यात येते की, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या (महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ कलम २६ मध्ये नमूद केलेले ) विविध प्राधिकरणांच्या निवडणुकीसाठी मतदार याद्या तयार करण्याची प्रक्रिया जून, २०१७ पासून सुरु झाली असून महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ कलम ६२ नुसार नवीन प्राधिकरणांची मुदत दि.०१ सप्टेंबर, २०१७ पासून पुढील पाच वर्षाकरीता असणार आहे.

नवीन प्राधिकरणे गठित करण्यासाठी विद्यापीठाच्या निवडणूक विभागाकडून निवडणूकपूर्व तयारी सुरु आहे. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ कलम २६ मध्ये नमूद केलेल्या सर्व प्राधिकरणांच्या निवडणुकीसंदर्भातील नाव नोंदणी सूचना, निवडणुकी संदर्भातील अधिसूचना, त्या अनुषंगाने इतर विषयांची आवश्यक संपूर्ण माहिती वेळोवेळी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येणार आहे. तसेच तळमजल्यावरील रुम नंबर १०६ समोरच्या नोटीस बोर्डावर व तिस-या मजल्यावरील रुम नंबर ४०७ च्या बाजूला नोटीस बोर्डावर निवडणूक प्रक्रियेशी निगडीत सर्व सूचना लावण्यांत येतील. याकरिता विविध प्राधिकरणांच्या निवडणुकीसाठी इच्छुक असलेल्या सर्व घटकांनी वेळावेळी विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेतस्थळावरील www.nmu.ac.in/election या portal वर तसेच उपरोक्त नमूद केलेल्या नोटीस बोर्डावर प्रसिध्द होणा-या सूचनांची माहिती घ्यावी.

निवडणूक सूचना व अधिसूचना या संदर्भातील कोणताही पत्रव्यवहार विद्यापीठाकडून केला जाणार नाही. याकरिता वेळोवेळी विद्यापीठाचे संकेतस्थळ बघण्याची / अवलोकन करण्याची जबाबदारी संबंधितांची असेल. तसेच याबाबत काही शंका/ अडचणी असल्यास विद्यापीठाच्या निवडणूक विभागास election2017@nmu.ac.in या e-mail id वर पाठवाव्यात अथवा ०२५७-२२५७३४८ या दूरध्वनीवर संपर्क साधावा.

सर्व संबंधितांनी उपरोक्त बाबीची नोंद घेवून विद्यापीठास सहकार्य करावे.

(प्रा. अ. बा. चौधरी)
प्र.कुलसचिव तथा
निवडणूक निर्णय अधिकारी

जा.क्र.उमवि/२/निवडणूक/२६/२०१७
दिनांक: ०१/०७/२०१७

पत्र पेटी क्र. : ८०, उमविनगर, जळगाव, दूरध्वनी क्र.०२५७-२२५७२११, १२, १४ आणि २२५७३४८ फॅक्स क्र. :०२५७-२२५८४०३, ४०६
Post Box No. : 80, Umavinagar, Jalgaon Telephone Nos. : 0257-2257211, 12 , 14 and 2257348
Fax Nos. : 0257-2258403, 406 e-mail Id : registrar@nmu.ac.in and election2017@nmu.ac.in